MHJN050015232025

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४०/२०२५
नानाभाऊ आकात वि. निरंक

**आदेश निशाणी क्र.०१ वर**
**(पारीत दिनांक १६/०३/२०२६)**

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन्स VIII, १८२७ चे कलम ३ व ७ अन्वये वारसा दाखला मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जातील शपथेवरील कथन वाचले. अर्जदाराने सादर केलेल्या दस्त ऐवजांची पाहणी केली. अर्जदाराच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३) अर्जात असे नमूद केले आहे की, अर्जदाराचे चुलते नामे **बाळासाहेब आश्रोबा आकात** हा दिनांक ०४/१०/२०२५ रोजी मौजे जालना, ता. जि. जालना येथे मयत झाला आहे. अर्जदाराचे चुलते मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** हा अविवाहीत असून त्याचे पालन पोषण व औषधोपचार हे अर्जदारानेच केलेले आहे. अर्जदाराचे चुलते मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात यांचे** आई वडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असून मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांना एक सख्खा भाऊ म्हणजेच अर्जदाराचे वडील नामे **रामभाऊ आश्रोबा आकात** हे होते, ते सुध्दा खुप वर्षापुर्वी मयत झालेले आहे. अशाप्रकारे अर्जदार हा मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त त्यांना कुणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामाकरीता मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांचे कायदेशीर

वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज सादर केला आहे.

४) अर्जदाराच्या उपरोक्त मागणी संदर्भात, दिनांक २३/१२/२०२५ रोजी **'जगमित्र'** या दैनिक वृत्तपत्रात निशानी क्र.१५ अन्वये जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. परंतु, अर्जदाराच्या उपरोक्त मागणीला आजतागायत कोणाचाही आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही.

५) अर्जदार यास अर्जाच्या सबुतीकरीता त्याच्या आधार कार्डाची पडताळणी केलेली प्रत निशाणी क्र.१२, मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत निशाणी क्र.१३ वर व ग्रामपंचायत कार्यालय आसनगांव/ढोणवाडी, ता. परतूर, जि. जालना यांनी अर्जदार यास दिलेल्या कुटुंब सदस्य प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१४ वर दाखल केल्या आहेत. तसेच, अर्जदार मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांची आई नामे **बकुळाबाई आश्रुबा आकात** व अर्जदार मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांचा भाऊ **रामभाऊ आश्रुबा आकात** यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या मुळ प्रती निशाणी क्र.१९ व २० प्रमाणे दाखल केलेल्या आहेत.

६) अर्जदार **नानाभाऊ रामभाऊ आकात** याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले असून अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार निरंक असल्यामुळे साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला नाही. त्यामुळे अर्जदाराचे शपथेवरील कथन अबाधित राहीले. त्याचप्रमाणे, अर्जदाराने

न्यायालयासमक्ष केलेले कथन तसेच, तोंडी व कागदोपत्री पुराव्याला आव्हान देण्याकरीता कोणीही न्यायालयासमक्ष आक्षेपक म्हणून हजर झाले नाहीत. त्यामुळे अर्जदाराची कथने व पुरावे अबाधित राहीले.

७) उपरोक्त परिस्थिती विचारात घेता निशाणी क्र.१३ वर दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रान्वये **बाळासाहेब आश्रोबा आकात** हा दिनांक ०४/१०/२०२५ रोजी मौजे जालना, ता. जि. जालना येथे मयत झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे, अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयताचे इतर कुणीही कायदेशीर वारस असल्याची बाब न्यायालयासमक्ष आलेली नाही. त्यामुळे अर्जदार हाच **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. करीता, मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार हा मयत **बाळासाहेब आश्रोबा आकात** यांचे कायदेशीर वारस आहेत, अशी औपचारीक मान्यता (Formal Recognition) देण्यात येते.

३) येणेप्रमाणे अर्जदाराने कोर्ट फी भरल्यानंतर औपचारीक मान्यतेचे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) सदर औपचारीक मान्यतेचे वारसा दाखला हे मयताच्या स्थावर किंवा जंगम मालमत्तेत (मुल्यांकनानुसार महाराष्ट्र कोर्ट फी कायद्याचे परिशिष्ट १ मधील कलम १२ नुसार योग्य ती कोर्ट फि भरल्याशिवाय) हक्क प्रस्थापित करण्याकरीता किंवा अर्जदाराच्या नावे फेरफार करण्याकरीता उपयुक्त राहणार नाही किंवा ग्राह्य

धरण्यात येवू नये. तसेच, या वारसा दाखल्याच्या आधारे मयताच्या बँक खात्यातील प्रलंबित रक्कमेची उचल करता येणार नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2026.03.16 18:01:46 +0530

**स्थळ** : परतूर
**दिनांक** : १६/०३/२०२६

**(व्ही. बी. डोंबे)**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),
परतूर

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M. D. Adhe |
| Court Name | :- | V. B. Dombe,<br>Civil Judge (J.D.), Partur |
| Order dictated on | :- | 16.03.2026 |
| Transcription ready on | :- | Direct on Computer |
| Order signed by P.O. on | :- | 16.03.2026 |
| Order uploaded on | :- | 16.03.2026 |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MADHAV DEVIDAS ADHE
Date: 2026.03.16 18:02:10 +0530

(Madhav D. Adhe)
Stenographer Grade-3